खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता.खेड, जि.पुणे 410505

## भूगोल विभाग

## वार्षिक अहवाल २०१९ - २०

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागामध्ये दरवर्षी अनेक उपक्रम राबवले जातात. भूगोल विभागामध्ये एफ.वाय.बी.ए.च्या पातळीवर सामान्यस्तर भूगोलाचे अध्यापन केले जाते तर एस.वाय.बी.ए. आणि टी.वाय.बी.ए.च्या वर्गांसाठी विशेष स्तरावर भूगोल विषयाचे अध्यापन केले जाते. शैक्षणिक वर्ष 2019—20 मध्ये एफ.वाय.बी.ए. या वर्गासाठी पहिल्या सेमिस्टरमध्ये प्राकृतिक भूगोल हा विषय शिकवला गेला तर व्दितीय सेमिस्टरसाठी मानवी भूगोल हा विषय शिकवला गेला. एस.वाय.बी.ए. या वर्गांसाठी सामान्य स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाचा भूगोल आणि विशेष स्तरावर पर्यटन भूगोल आणि प्रात्यक्षिक हे विषय शिकवले गेले. टी.वाय.बी.ए. या वर्गासाठी सामान्य स्तरावर भारताचा प्रादेशिक भूगोल आणि विशेष स्तरावर लोकसंख्या आणि वस्ती भूगोल तसेच प्रात्याक्षिक हा विषय शिकवला गेला.

भूगोल विभागामध्ये दरवर्षी अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष 2019 — 20 साठी एस.वाय. बी.ए. या वर्गासाठी 46 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता तर टी.वाय.बी.ए. या वर्गासाठी 42 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता. एस.वाय.बी.ए.च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रा.डी.एम.मारकड सहभागी होते. टी.वाय.बी.ए.च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रा.दिलीप मुळूक सहभागी होते.

2019—20 या शैक्षणिक वर्षाचा दि. 15/06/2019 या दिवशी प्रारंभ झाला. त्यानंतर भूगोल विभागामध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन प्रत्यक्ष वर्गाध्यापनास सुरूवात झाली. एफ.वाय.बी.ए.या वर्गास विभागप्रमुख दिलीप मुळूक आणि प्रा.एम.एल. मुळूक यांनी अध्यापन केले. तर एस.वाय.बी.ए. आणि टी.वाय. बी.ए. या वर्गांना विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा.डी.एम.मारकड आणि प्रा.एम.एल. मुळूक यांनी अध्यापन केले.

दरवर्षीप्रमाणे भूगोल विभागात याही वर्षी दि. 14/08/19 रोजी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. टी.वाय.बी.ए.च्या विद्यार्थ्यांनी एस.वाय.बी.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.एम.जरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी 80 विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.एम.एल.मुळूक आणि प्रा.डी.एम.मारकड यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.दिलीप मुळूक हे होते.

अलेक्झांडर व्हॉन हंबोल्ट हे भूगोल या विषयाचे जनक समजले जातात. भूगोल विभागामध्ये दि. 14/09/2019 रोजी अलेक्झांडर व्हॉन हंबोल्ट यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी अलेक्झांडर व्हॉन हंबोल्ट यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच विभागातील प्राध्यापक एम.एल.मुळूक यांनी अलेक्झांडर व्हॉन हंबोल्ट यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. हंबोल्ह हे जर्मन शास्त्रज्ञ असून त्यांनी आधुनिक भूगोलामध्ये मूलभूत संषोधन कार्य केले असल्याने त्यांना आधुनिक भूगोलाचे जनक असे म्हणतात असे प्रा.एम. एल. मुळूक यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

दिनांक 21 /09/2019 रोजी भूगोल मंडळाच्या उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाची संकल्पना विभागप्रमुख प्रा.दिलीप मुळूक यांची होती तर कार्यक्रमाचे नियोजन प्रा.एम.एल.मुळूक यांनी केले. महाविद्यालयातील कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्बोधित केले. त्यानंतर त्याच दिवशी एस.वाय.बी.ए.आणि टी.वाय.बी.एच्या विद्यार्थ्यांसाठी भूगोलाच्या सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. या प्रश्न मंजुषेत 50 प्रश्न विचारण्यात आलेले होते. यामध्ये 53 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. होता. त्यापैक एस.वाय.बी.ए.च्या आणि टी.वाय.बी.ए.च्या गुणानुक्रमे आलेल्या तीन विद्यार्थ्यांना बक्षिस देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

भूगोल विभागामध्ये विद्यार्थ्यांना परिसरातील प्रश्नाची जाणीव व्हावी तसेच त्यांना सभावेतालच्या परिसंस्थांचे आकलन व्हावे म्हणून भूगोल विभागामध्ये क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते. या शैक्षणिक वर्षात क्षेत्रभेटीसाठी कुकडी नदीवरील निघोज येथील रांजणखळगी आणि आदर्श गांव राळेगणसिद्धी यांची निवड करण्यात आलेली होती. विभागप्रमुख प्रा.दिलीप मुळूक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डी.एम.मारकड आणि प्रा.एम.एल.मुळूक यांनी क्षेत्रभेटीचे नियोजन केले. या क्षेत्रभेटीमध्ये टी.वाय.बी.ए.च्या 26 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. या क्षेत्रभेटीमध्ये विद्यार्थ्यांनी निघोज येथील कुकडी नदीवरील जगप्रसिद्ध रांजणखळगी पाहिली. त्यानंतर आदर्श गांव राळेगणसिद्धीला भेट दिली. तेथील गांवाच्या विकासाचे मॉडेल विद्यार्थ्यांनी पाहिले. तेथे ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांची भेट झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

दि. 5/10/2019 ते 20/10/2019 या कालावधीत विभागप्रमुख प्रा.दिलीप मुळूक यांनी ऑनलाईन टेस्टचे नियोजन केले होते. या दरम्यान त्यांनी एफ.वाय.बी.ए.च्या वर्गासाठी चार ऑनलाईन टेस्ट घेतल्या. या टेस्टमध्ये सरासरी 397 विद्यार्थ्यांनी भाग घेतलेला होता.

दि.2/12/19 रोजी प्रा.एम.एल.मुळूक यांनी विद्यार्थ्यांना सर्वेक्षणाचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामध्ये 42 विद्यार्थी सहभागी झालेले होते. यामध्य प्रा.एम.एल.मुळूक यांनी विद्यार्थ्यांना समतलपाट सर्वेक्षणाचे प्रशिक्षण दिले.

भूगोल विभाग सर्वेक्षण आणि मोजणीच्या बाबतीत अग्रेसर असतो. दि. 3/01/20 या दिवशी भूगोल विभागातील टी.वाय.बी.ए.च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या इमारतीचे इन्फ्रास्ट्रक्चर सर्वेक्षण केले. त्यामध्ये त्यांना महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये 50 वर्गखोल्या आढळून आल्या. 31 प्रयोगशाळा, 28 केबिन, आणि 7 हॉल्स आढळून आले. तसेच दि. 6/01/20 रोजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील वृक्षांच्या मोजणीचे काम केले. हे काम त्यांनी महाविद्यालयातील वनस्पती विभागाच्या साहायाने केले. महाविद्यालयीन परिसरात विद्यार्थ्यांना विविध जातींचे 268 वृक्ष आढळून आले. या कामासाठी विद्यार्थांच्या प्रा.जी.एल.भोर, डॉ.के.एम.नितनवरे, डॉ. संगिथा ज्योती आणि प्रा.डी. एम.मारकड यांचे मार्गदर्शन लाभले.

भूगोल विभागामध्ये दि. 6/01/2020 ते 01/30/2020 या दरम्यान जमीन सर्वेक्षणाच्या संबंधी कोर्सचे आयोजन केले गेले होते. या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना लोलकीय होकायंत्र सर्वेक्षण, समतलफलक सर्वेक्षण, डंपी लेवल सर्वेक्षण, थेडोलाईट सर्वेक्षण, या प्रकारचे सर्वेक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. सचिन शिंदे (पाटबंधारे अभियंता) राजेंद्र रत्नपारखी (सर्वेअर) विभागप्रमुख प्रा. दिलीप, मुळूक, प्रा.एम.एल.मुळूक, प्रा.डी.एम.मारकड, यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

भूगोल विभागामध्ये दरवर्षी सहलीचे आयोजन करण्यात येते. 2019 – 20 या शैक्षणिक वर्षात दोन सहलींचे आयोजन करण्यात आले होते. एक सहल ही एफ.वाय.बी.ए.च्या वर्गासाठी असून ती एक दिवशीय होती. ही सहल भूगोल विभाग, गणित आणि संख्याशास्त्र विभाग यांनी आयोजित केलेली होती. ही सहल पाली, उन्हेरे, मुरूड जंजिरा, काशिद बीच, अलिबाग या मार्गे होती या सहलीमध्ये विद्यार्थ्यांना ऐतिहासिक माहिती तसेच भौगोलिक माहितीही देण्यात आली. या सहलीसमवेत कला विभाग उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.डी.डी.मुळूक, प्रा.एम.एल.मुळूक, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा.रूपाली वायाळ, प्रा. संदीप थोरात आदि प्राध्यापक उपस्थित होते.

एस.वाय. आणि टी.वाय.बी.ए.च्या विद्यार्थ्यांच्यासाठी भूगोल विभागामध्ये तीन दिवशीय अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीत भूगोल विभागातील एस.वाय.बी.ए.च्या 47 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. ही अभ्यास सहल कोल्हापूर, रत्नागिरी, गणपती पुळे, डेरवण, महाबळेश्वर या मार्गे आयोजित केलेली होती. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी सागरी लाटांचे कार्य, धार्मिक पर्यटन, मासेमारी, कोकणातील भातशेती यांचा अभ्यास केला. या सहलीचे मार्गदर्शन आणि आयोजन प्रा.दिलीप मुळूक यांनी केले तर प्रा.एम.एल.मुळूक यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या भौगोलिक स्थळांविषयी माहिती सांगितली.

भूगोल विभागाच्या माध्यमातून दरवर्षी गावसर्वेक्षण केले जाते. यावर्षी टी.वाय. बी.ए.च्या विद्यार्थ्यांनी 'निमगांव खंडोबा' या गावाचे गाव सर्वेक्षण केले. तेथील कृषी व्यवसाय, वसाहती,

वाहतूक, पर्यटन यांचा अभ्यास केला. प्रा.दिलीप मुळूक आणि प्रा.एम.एल. मुळूक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमामध्ये 33 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या शैक्षणिक वर्षात भूगोल विभागातील विद्यार्थ्यांनी राजगुरूनगर शहरातील आणि आजूबाजूच्या परिसरातील प्रदूषण मोजण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला. यामध्ये विद्यार्थ्यांनी दि. 25/02/20 रोजी राजगुरूनगर परिसरातील वीटभट्टयांचे सर्वेक्षण केले. तेथे जाळला जाणारा कोळसा आणि त्यामुळे होणारे हवाप्रदूषण यांचा अभ्यास केला. तसेच दि. 27/02/20 रोजी राजगुरूनगरमध्ये हॉटेल व्यवसायामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा अभ्यास केला.

पुणे नाशिक हा महत्वाचा राष्ट्रीय महामार्ग राजगुरूनगरहून जातो. भूगोल विभाग आणि आय.आय.टी.एम.पुणे यांनी संयुक्तरित्या या महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांचे सर्वेक्षण केले. टी.वा.बी. ए.च्या विद्यार्थ्यांनी या सर्वेक्षणात भाग घेतलेला होता. सकाळी 7 ते सायंकाळी 7 या काळात या रस्त्यावरून सुमारे 42475 स्व्यंचलित वाहने गेली असे या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आले. यामध्ये दुचाकी वाहने 23038 होती. तीन चाकी रिक्षा 700 तर बाकीची वाहने चारचाकी व मोठी वाहने होती. या सर्वेक्षणाच्या उपक्रमात 22 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

दि. 11/30/20 रोजी भूगोल विभागात निरोप समारंभ साजरा करण्यात आला. या समारंभास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, आणि उपप्राचार्य डॉ. एस.डी शिंदे हे उपस्थित होते. डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. जरे यांनी भूगोल विभागाच्या कामाची प्रशंसा केली. प्रा.दिलीप मुळूक यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले.

भूगोल विभागप्रमुख प्रा दिलीप मुळूक यांच्या कल्पनेतून भूगोल विभागामध्ये छायाचित्रांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर भूगोल विभागामध्ये एस.वाय.बी.ए. आणि टी.वाय. बी. ए.यांच्या प्रात्यक्षिक सराव परीक्षा घेण्यात आली. दि. 17/03/2020 पासून कौरोना व्हायरस चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी लॉकडाऊन सुरू झाल्याने हे शैक्षणिक वर्ष तात्पुरते स्थगित करण्यात आले.

प्रा. डॉ. दिलीप मुळूक
भूगोल विभाग प्रमुख